North Asian International Research Journal of Social Science & Humanities
IRJIF I.F. : 5.010
ISSN: 2454-9827 Vol. 7, Issue-9 September -2021
Index Copernicus Value: 57.07 DOI NUMBER: 10.6947/2454-9827.2021.00009.9 Thomson Reuters ID: S-8304-2016
*A Peer Reviewed Refereed Journal*

# कौटूंबिक मानसिक आरोग्याचा महिलाच्या अत्याचारांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास —विशेष संदर्भ वाशिम जिल्हा

# A Study of family mental health of womens relation to women violence : Special Reference to Washim District

**डॉ. प्रशांत विनायकराव बुकणे**
सहा.प्राध्यापक
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

**Dr. Prashant Vinayakrao Bukne**
Assistant Professor
Shri saraswati College of Social Work, Washim

**सार :**

*प्रस्तुत संशोधनामध्ये महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटूंबातील महिलांच्या अत्याचाराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. वाशिम जिल्हयामधील ग्रामीण भागातील एकूण १०० महिलांची या संशोधनासाठी नमूना म्हणून निवडण्यात आली आहे. आवश्यक तथ्य संकलन करण्यासाठी स्व—निर्मित कौटूंबिक मानसिक आरोग्य चाचणी आणि कौटूंबिक स्तरावर होणारे महिला अत्याचाराची मापीका या साधनांचा वापर करुण आवश्यक तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. या संशोधनाच्या संदर्भात तथ्य विश्लेषणावरुन दिसून येते की, सर्वेक्षित कुटूंबातील महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अत्याचारावर सार्थक प्रभाव पडतो. यामध्ये उच्च मानसिक आरोग्य असलेल्या महिलांच्या कुटुंबामध्ये महिलावरील अत्याचाराचे प्रमाण निम्न आहे तर निम्न मानसिक आरोग्य असलेल्या महिलांच्या कुटुंबामध्ये महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण उच्च असल्याचे दिसून येते.*

**प्रस्तावना :**

मानसिक आरोग्याची भूमिका परिवारीक आणि कौटुंबिक समन्वय आणि शांतता राखण्यासाठी महत्वपूर्ण आहे. आजच्या युगामध्ये महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत आहे यामध्ये सुशिक्षित समाजाबरोबरच अशिक्षित समाजामध्ये सुध्दा ही स्थिती आढळून येते. ग्रामीण भागामध्ये आढळून येणारी संयुक्त कुटुंब पध्दतीच्या अंतर्गत संपूर्ण कुटुंबातील व्यक्ती एकत्र राहत असल्यामुळे परिवारामध्ये आणि कुटुंबामध्ये सलोखा राखण्याचा प्रयत्न होत होता कुटुंबातील लहान

सहान वाद—विवाद कौटुंबिक स्तरावर सोडविण्यात येत असत परंतु आजच्या काळामध्ये ग्रामीण भागात सुध्दा संयुक्त कुटुंबपध्दतीचा —हास होवून विभक्त कुटुंब पध्दती प्रत्ययास येत आहे. आधुनिक काळामध्ये घडून आलेले मोठया प्रमाणावरील परिवर्तन आणि विचारप्रवाह हे महिलांवरील अत्याचाराला कारणीभूत असले तरी सुध्दा कुटुंबातील व्यक्तींचे मानसिक आरोग्य कसे आहे या बाबी सुध्दा आजच्या काळामध्ये महिलांवरील अत्याचाराला कारणीभूत ठरत आहे. महिलावरील अत्याचाराला कारणीभूत ठरणा—या पांरपारीक कारणांची तिव्रता आजच्या काळात कमी होवून नविन कारणांची उत्पत्ती होत असल्याचे दिसून येते त्यापैकीच कुटुंबातील व्यक्तींचे मानसिक आरोग्य महत्वूपर्ण कारक आहे. अशा स्थितीत कुटुंबातील व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अत्याचाराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

### संशोधनाची उदिद्ष्टये :

१. महिलांच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्यांच्या अत्याचाराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.

२. महिलांच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्यांच्या अत्याचारावरील प्रभावाचा अभ्यास करणे.

### परिकल्पना :

१. महिलांच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्यांच्यावर होणा—या कौटुंबिक अत्याचाराशी सहसंबंध नाही.

२. महिलांच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्यांच्या कौटुंबिक अत्याचारावर प्रभाव पडत नाही.

### संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्य हे वाशिम जिल्हयातील ग्रामीण भागापूरतेच मर्यादित आहे यामध्ये कुटुंबामधील व्यक्तींच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्या कुटुंबातील महिलांवरील अत्याचाराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

### संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. कुटुंबातील व्यक्तींच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा स्तरनिहाय शोध घेवुन त्या कुटुंबामध्ये महिलावरील अत्याचाराच्या संदर्भात आवश्यक तथ्यांचे संकलन हे सर्वेक्षणाच्या माध्यमातुन करण्यात आलेले आहे.

**संशोधनाची जनसंख्या आणि नमुना :**

प्रस्तुत संशोधनामध्ये वाशिम जिल्हयातील ग्रामीण भागातील सर्व महिला हया प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे या एकूण जनसंख्येमधून संभाव्य नमूना निवड पध्दतीचा वापर करुन एकूण २०० महिलांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे.

**संशोधनाची साधने व तथ्य संकलन :**


प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक तथ्यांचे संकलन करण्यासाठी स्वनिर्मित कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्य चाचणी आणि महिलावरील अत्याचाराच्या संदर्भात मापणी विकसित करण्यात आली आहे. तीचे प्रमाणिकरण करुन आवश्यक तथ्यांचे संकलन या संशोधनाच्या संदर्भात करण्यात आले आहे.

**तथ्य विश्लेषण :**

**सारणी क्र. १.१**

**संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील व्यक्तींचे कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्य आणि त्यांच्या कुटुंबातील महिलांवरील अत्याचार यांच्यामधील सहसंबंध दर्शवणारी सारणी**


| कुटुंब प्रकार | स्वतंत्र चल | आश्रित चल | संख्या | स्वाधिनता मात्रा | सहसंबंध गुणांक | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| संयुक्त कुटुंब | मानसिक आरोग्य | महिला अत्याचार | १०० | ९८ | –.००२ | ऋणात्मक परंतु सार्थक सहसंबंध नाही |
| विभक्त कुटुंब | मानसिक आरोग्य | महिला अत्याचार | १०० | ९८ | –.०२५ | ऋणात्मक परंतु सार्थक सहसंबंध नाही |
| एकूण | मानसिक आरोग्य | महिला अत्याचार | २०० | १९८ | –.०१६ | ऋणात्मक परंतु सार्थक सहसंबंध नाही |



**सारणी क्र. १.२**

**संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील महिलांच्या कौटूंबिक स्तरावरील मानसिक आरोग्याचा त्यांच्या कौटुंबिक अत्याचारावरील प्रभावाचे विवरण दर्शवणारी सारणी**

| कुटुंब प्रकार | स्त्रोत SV | वर्गाची बेरीज SS | स्वाधिनता मात्रा df | मध्यमान वर्ग MS | प्रसरण अनुपात F-Ratio | सार्थकता Sig |
|---|---|---|---|---|---|---|
| संयुक्त कुटुंब | BSS | ५२.१७८ | २ | २६.०८९ | ०.७०० | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | WSS | ३६११.६६२ | ९७ | ३७.२३३ | | |
| | Total | ३६६३.८४० | ९९ | | | |
| विभक्त कुटुंब | BSS | १४४.५१७ | २ | ७२.२५९ | १.९६४ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | WSS | ३५६७.३२३ | ९७ | २४.२६८ | | |
| | Total | ३७११.८४० | ९९ | | | |
| एकूण | BSS | २००.७०७ | २ | १००.३५३ | २.७२६ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | WSS | ७२४९.९७३ | १९७ | २४.४११ | | |
| | Total | ७४५०.६८० | १९९ | | | |



### १.९ संशोधनाचे निष्कर्ष :

महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अत्याचाराशी असलेल्या संबंधाच्या संदर्भात संयुक्त, विभक्त आणि सर्वेक्षित एकूण महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांवरील अत्याचाराशी संबंध असल्याचे आढळून येत नाही. म्हणजे मानसिक आरोग्यामध्ये होणा—या बदलाच्या प्रमाणात त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अंत्यांचारामध्ये बदल होत नसल्याचे दिसून येते. तसेच संयुक्त कुटुंबातील महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अत्याचारावर सार्थक प्रभाव पडत नसल्याचे दिसून येते. विभक्त कुटुंबातील महिलांच्या आणि सर्वेक्षित महिलांच्या मानसिक आरोग्याचा त्यांच्या कुटुंबातील महिलांच्या अत्यांचारावर सार्थक प्रभाव पडत नसल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


- जोगळेकर मृणालीनी (१९९७) स्त्री अस्मितेचा आविष्कार, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.
- जोशी डॉ. अनंत, सौ. महाले संजिवनी (२०१३) संशोधन अहवालाची पद्धती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

- जोशी तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री(१९७६) मराठी विश्वकोष खंड–४, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
- घाटोळे रा.ना. (१९९०) समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.
- होडारकर पद्मजा सहस्त्रबुद्धे व.ग.(१९२१) भारतीय संस्कृती कोष खंड– २.भारतीय संस्कृती कोष मंडळ, पुणे.
- जरारे व्ही.एल. (२००४) संशोधन प्रणाली, अद्धैत प्रकाशन, अकोला.